पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे.
दुरध्वनी क्र.02562-288200
फॅक्स क्र.2562/229188
E-Mail-sp.dhule@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

## 95 लाख रुपयांचा सायबर फ्रॉड करणाऱ्या तीन आरोपीतांना केले जेरबंद

दिनांक 24/10/2024 रोजी महाराष्ट्र ऑईल एक्सट्रक्शन प्रा. लि. कंपीनचे डायरेक्टर असल्याचे भासवून कंपनीचे अकाऊंटंट यांना Whatsapp मेसेज करुन एका नवीन प्रोजेक्टची बोलणी फायनल झाली असून त्या प्रोजेक्टचा ॲडव्हान्स भरणेसाठी तात्काळ 95 लाख रुपये दिलेल्या अकाऊटवर RTGS व्दारे रक्कम भरण्यास सांगितले. सदरच्या मोबाईलवर असलेल्या Whatsapp DP वर कंपनीच्या मालकाचा फोटो पाहून सदर मेसेज हा मालकांनी केल्याचे अकाऊटंट याना वाटले त्यावरुन त्यांनी तात्काळ 95 लाख रुपये RTGS व्दार ट्रान्सफर केले. तदनंतर परत दुसऱ्या दिवशी 85 लाखांची मागणी आल्यानंतर अकाऊटंट यांनी कंपनीच्या इतर मालकांकडे सदरची बाब सांगितली. तेव्हा त्यांचेसोबत सायबर फ्रॉड झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी तात्काळ सायबर पोलीस ठाणे, धुळे येथे गुन्हा नोंदविला.

त्यानुसार पोनि/श्री.सुरेश घुसर सायबर पोलीस ठाणे यांनी त्यांचे सायबर पोलीस स्टेशनचे पथक तयार केले. गुन्हयाचे अनुषंगाने तपास चक्र फिरवून नमुद गुन्हयातील आरोपी हे नाशिक येथे असल्याचे निष्पन्न होत असल्याने, तपास पथक नाशिक येथे रवाना करुन नाशिक येथुन 1. मुजम्मील मुस्तक मनियार, वय 25 वर्ष 2. सरफराज हुसैन शेख, वय 27 वर्ष असे 02 आरोपी तसेच चांदवड येथून आवेश रफिक पिंजारी यास पाठलाग करुन पकडण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे पोनि श्री. सुरेश घुसर, असई/ संजय पाटील, पोहेकॉ/भुषण खलाणेकर, पोहेकॉ/ राजु मोरे, पोकॉ/ तुषार पोतदार, पोकॉ/ चेतन सोनगीरे, पोकॉ/प्रसाद वाघ, पोकॉ/ विवेक बिऱ्हाडे, चापोकॉ/ महेंद्र जाधव यांचे पथकाने केलेली आहे. गुन्हयातील 03 आरोपीतांना अटक करुन दि.21/12/2024 रोजी मा. न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने दिनांक 25/12/2024 रोजी पावेतो पोलीस कोटडी दिली आहे.